महाराष्ट्र पोलीस

पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम.
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम ता.जि.वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र. ०७२५२–२३४८३४.
ई–मेल:- sp.washim@mahapolice.gov.in
Website: www.washimpolice.gov.in

महाराष्ट्र पोलीस

## प्रेस नोट

### मालेगांव येथील खुनासह दरोडयाचा मालेगांव पोलीसांनी ४८ तासाच्या आत लावला छडा

पो.स्टे. मालेगाव येथे दि. २१/१२/२०२१ रोजी रात्री ०८:३० ते ०९:०० वा. अंजनकर ज्वेलर्स चे मालक योगेश गजानन अंजनकर हे त्यांचे सोन्याचे दुकान बंद करून अदाजे २०० ग्रॅम सोन्याचे गोळे व नगदी ९०००/– रू असा एकुण माल ९,०९,०००/– रू चा माल असलेली बॅग घेवुन त्याच्या दुकानामध्ये काम करणारा कारागीर रविंद्र वाळेकर यास सोबत घेवुन घरी जात असतांना लाड वकीलाचे घराचे मागे, देशपांडे लेआऊट मालेगाव येथे अज्ञात दरोडेखोरानी त्याची गाडी आडवुन योगश अंजनकर व रविंद्र वाळेकर याचे डोळ्यात मिरची पुड फेकुन त्याच्यावर चाकुने वार करून योगेश अंजनकर व रविंद्र वाळेकर यानां गंभीर जखमी केले. व परिसरात दहशत पसरविण्याचे उद्देशाने गावठी कट्टयामधुन फायर केला. व योगेश अंजनकर यांचे जवळील ९,०९,०००/– रू चा मुद्देमाल असलेली बॅग घेवुन मोटरसायकल ने पळुन गेले. वरून पो.स्टे. मालेगाव येथे अज्ञात आरोपीतान विरूध्द अप.क्र. २५५/२१, कलम ३९६, ३९७, भदवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधिक्षक श्री. बच्चन सिंह सर, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री गौरव भामरे सर, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. सुनिल पुजारी सर यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शना खाली मालेगांव येथील तपास पथकाने त्यांचे गोपणीय बातमीदाराचे माध्यमातुन व तांत्रीक दृष्ट्या तपास चक्र फिरवुन अवघ्या ४८ तासाच्या आत गुन्हयाची उकल करून मालेगांव तालुक्यातील ग्राम सुकंडा येथुन अजबराव पंजाबराव घुगे यास अटक करून त्याच्याकडुन गुन्हयात वापरलेले दोन गावठी कट्टे व लहान–मोठे सोन्याचे गोळ्याचे तुकडे ज्याचे एकुण वजन ५३ ग्रॅम अदाजीत किंमत २,४०,००० रू चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. सदर आरोपी यांनी १२ लाखाची पोल्ट्री बांधली होती त्याकरीता त्याल खुप खर्च आला करीता त्याने स्वत:चे सोनेही यातील फिर्यादी अंजनकर ज्वेलर्स केडे गहान ठेवले होते. पोल्ट्री करीता त्याला पैशाची अत्यंत गरज होती. त्याकरीता आरोपी हे वारंवार सोनार अंजनकर ज्वेलर्स यांचेकडे जात होते. त्यादरम्यान त्याचे आपसी मतभेद झाल्यामुळे आरोपी व गुन्हयातील उर्वरीत साथीदार यांचे मदतीने सदर गुन्हा घडवुन आणला आहे. सदर तपासाचे चक्र फिरवुन गुन्हयातील उर्वरीत आरोपीचे शोध कामी पोउपनि रामकीसन जायभाये, पोउपनि महल्ले, पोउपनि शेख तसेच स्थानिक गुन्हे शाखा यांचे तपास पथक वेगवेगळ्या दिशेने पथक रवाना करण्यांत आले आहे. सदर गुन्हयातील उर्वरीत आरोपी यांना सुध्दा लवकरात लवकर अटक करण्यात येईल.

सदर गुन्ह्याचा तपास मा. पोलीस अधिक्षक बच्चन सिंह सर, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री गौरव भामरे सर, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. सुनिल पुजारी सर, पोनि सोमनाथ जाधव सर यांच्या मार्गदर्शनामध्ये मालेगांव येथील तपास पथक पोनि प्रविण धुमाळ, सपोनि पुष्पलता वाघ, पोउपनि आकाश महल्ले, पोउपनि रामकीस जायभाये, पोहेकॉ कैलाश कोकाटे,पोहेकॉ प्रशांत वाढनकर, पोहेकॉ गजानन झगरे, पोहेकॉ गजानन पाचाळ, नापोकॉ आशिष बिडवे,नापोकॉ सुधीर सोळंके,पोकॉ गणेश बोडखे, पोकॉ अशिष कोल्लेकर, पोकॉ अमोल पाटील, पोकॉ विजु इंगोले, पोकॉ संदिप वायाळ, पोकॉ किशोर नवलकर, व सायबर सेल येथील पोकॉ दिपक घुगे आणि महेश वानखेडे व स्थानिक गुन्हे शाखा वाशिम येथील स्टाफ यांच्या पथकाने गुन्हा उघडकीस आणण्यामध्ये महत्वाची भुमीका पार पाडली आहे.

(एस.एम.जाधव) २३/१२
पोनि स्थानिक गुन्हेशाखा
वाशिम